| MHYA070013272015 | **दाखल दिनांक** | : | २२/०९/२०१५ |
|---|---|---|---|
| | **नोंदणी दिनांक** | : | २२/०९/२०२५ |
| | **निकाल दिनांक** | : | १०/०७/२०२६ |
| | **कालावधी** | : | १० **वर्ष** ०९ **म** १८ **दि** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र. २), दारव्हा, जि. यवतमाळ यांचे न्यायालय**

(पीठासीन अधिकारी श्री. निलेश ल. पाटील)

**(पारित दिनांक १० जुलै, २०२६)**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. ६६८/२०१५**

**गुन्हा रजिस्टर क्र. ८७/२०१५. (लाडखेड पो. स्टे.)**

**निशाणी क्र. ३९.**

**अभियोग पक्ष** :

महाराष्ट्र सरकार, तर्फे

पोलीस ठाणे अधिकारी लाडखेड,

ता. दारव्हा, जि. यवतमाळ.

**सरकारतर्फे**:

**श्री. सी. बी. उके,**

**विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

**.. विरुध्द..**

**आरोपी :**

**सखाराम नागोराव अवथळे,**

**वय** – ६० वर्षे, **व्यवसाय** – शेती,

**रा.** सोनखास हेट्टी, ता. नेर, जि. यवतमाळ

**आरोपीतर्फे** : **विधीज्ञ श्री एस. जी. पाटील**

# न्या य नि र्ण य

१.

| | |
|---|---|
| **अपराध घडल्याचा दिनांक** | २७/०६/२०१५ |
| **प्रथम खबर दिनांक** | २७/०६/२०१५ |
| **दोषारोप दाखल केल्याचा दिनांक** | २२/०९/२०१५ |
| **दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक** | २१/०६/२०२२ |
| **पुरावा नोंदविण्यास सुरुवात केल्याचा दिनांक** | ०८/०५/२०२६ |
| **न्यायनिर्णयासाठी ठेवल्याचा दिनांक** | १०/०७/२०२६ |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १०/०७/२०२६ |
| **शिक्षेच्या आदेशाची तारीख असल्यास.** | लागु नाही. |

२. आरोपीचा तपशील :

| आरोपींची रँक | आरोपींचे नावे | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचा तपशील | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षा कालावधी | खटला चालू असल्याच्या दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधी, फौ.प्र.सं. कलम ४२८ साठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | सखाराम | आरोपीस | आरोपीस | भारतीय | निर्दोष | निरंक | लागू नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नागोराव अवथळे | दिनांक २२/०७/२०१५ रोजी अटक केली. | दिनांक २२/०७/२०१५ रोजी जामीनावर सोडले. | दंड सहितेचे कलम ३४१, ५०४ आणी ५०६ अन्वेय | | | |

**३–अभियोग पक्षाचे साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाचे साक्षीदार असल्यास:**

**अ:– अभियोग पक्षाचे साक्षीदार:**

| रॅंक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| **सा. क्र. १/ नि. क्र. ३२** | प्रेमचंद मानुचंद नहार | फिर्यादी |
| **सा. क्र. २/ नि. क्र. ३५** | सुशिलकुमार प्रेमचंद नहार | प्रत्यक्ष साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार** : आरोपीने पुरावा दिला नाही.

**क. न्यायालयीन साक्षीदार** : निरंक.

**४. अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचे दस्तास निशाणी बाबत यादी** :

**अ. अभियोग पक्षाचे निशाणी** :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| **१** | नि.क्र. ३३/ सा. क्र. १ | फिर्याद |
| **२** | नि.क्र. ३४/ सा. क्र. १ | प्रथमखबर अहवालाची प्रत |

**ब. बचाव पक्षाचे निशाणी** : निरंक.

**क. न्यायालयाची निशाणी**: निरंक.

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| **१** | नि. क्र. १८ | दोषारोप |
| **२** | नि. क्र. १९ | फौ. प्र. सं. चे कलम २०७ प्रमाणे आरोपी दोषरोपत्राच्या नक्कल मिळाल्या व गुन्हा कबुल नसल्या बाबतचे निवेदन |
| **३** | नि. क्र. ३८ | आरोपी फौ. प्र. सं. चे कलम ३१३ प्रमाणे नोंदविलेले निंवदेन |

**ड. विशेष साहित्य** (**मटेरियल ऑब्जेक्ट**): निरंक

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३४१, ५०४ आणी ५०६ अन्वेय दोषारोप पत्र दाखल केले आहे.

## अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे

**०२.** फिर्यादीची मौजे उत्तरवाढोणा शिवारातील गट क्रमांक १९८ व १९९ मधील शेतजमीन असून त्या शेताच्या वहीवाटीसाठी आरोपीच्या शेतालगतून जाणारा पांदण रस्ता वापरला जातो. दिनांक २७/०६/२०१५ रोजी सकाळी सुमारे १०.०० ते ११.०० वाजण्याच्या दरम्यान फिर्यादी हा बैलगाडीत पेरणीचे साहित्य व बी–बियाणे घेऊन शेताकडे जात असताना आरोपीने त्याची बैलगाडी अडवून, सदर पांदण रस्ता फिर्यादीच्या वहीवाटीचा नसल्याचे सांगत त्याच्याशी वाद घातला. आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ

करून, यापुढे या रस्त्याने आल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीसोबत असलेल्या व्यक्तींनी आरोपीस समजाविण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपीने रस्ता मोकळा न केल्याने फिर्यादीस बैलगाडी परत घेऊन जावे लागले. आरोपी हा नेहमीच शेताच्या वहीवाटीच्या पांदण रस्त्याच्या कारणावरून वाद घालून शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या देत असल्याने फिर्यादीने त्याच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात दिली.

**०३.** सदर फिर्यादवरुन लाडखेड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ८७/२०१५ हा भारतीय दंड संहीतेचे कलम ३४१, ५०४ आणी ५०६ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास असई संजय रामराव इंगोले लाडखेड पोलीस स्टेशन यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले, आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने त्यांनी आरोपी विरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३४१, ५०४ आणी ५०६ अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** माझ्या पुर्वीचे पिठासन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३४१, ५०४ आणी ५०६ (II) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयांचा दोषारोप नि. क्र. १८ वर निश्चीत केला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन करुन संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि दोषारोप पाहता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले. त्या प्रत्येक मुद्दयांचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्यांची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २७/०६/२०१५ रोजी सकाळी सुमारे १०.०० ते ११.०० वाजण्याच्या दरम्यान मौजे उत्तरवाढोणा शिवारात आरोपीने फिर्यादीचा पांदण रस्त्यावर बेकायदेशीरपणे रस्ता अडवून त्यास जाण्यापासून प्रतिबंध केला व त्यामुळे भारतीय दंड संहिता कलम ३४१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नाही |
| २ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, त्याच वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जाणीवपूर्वक शिवीगाळ करून शांततेचा भंग होईल किंवा गुन्हा घडण्यास प्रवृत्त होईल अशा हेतूने अपमान केला व त्यामुळे भारतीय दंड संहिता कलम ५०४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नाही |
| ३ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, त्याच वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी देऊन भारतीय दंड संहिता कलम ५०६ (भाग–II) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नाही |
| ४ | कोणता आदेश? | आरोपीची निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## – : कारणमिमांसा :

## मुद्दा क्र. १ ते ३ बाबत:

**अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, आरोपीने फिर्यादीचा रस्ता अडवून भारतीय दंड संहिता कलम ३४१ अन्वये, शिवीगाळ करून कलम ५०४ अन्वये व जीवे मारण्याची धमकी देऊन कलम ५०६ (भाग–II) अन्वये शिक्षापात्र गुन्हे केले?**

**०६.** हे तिन्ही मुद्दे एकाच घटनेशी, एकाच पुराव्याशी व एकाच व्यवहाराशी संबंधित असल्यामुळे त्यांचा एकत्रित विचार करणे उचित ठरेल.

**०७.** अभियोग पक्षाचा युक्तिवाद असा आहे की, फिर्यादी यांची मौजे उत्तरवाढोणा शिवारातील गट क्रमांक १९८ व १९९ मध्ये शेतजमीन असून त्या शेताच्या वहीवाटीसाठी संबंधित पांदण रस्ता वापरला जातो. दिनांक २७/०६/२०१५ रोजी फिर्यादी हा बैलगाडीत पेरणीचे साहित्य घेऊन शेताकडे जात असताना आरोपीने त्याची बैलगाडी अडवून सदर रस्ता त्यांचा नसल्याचे सांगितले, शिवीगाळ केली व पुन्हा या रस्त्याने आल्यास जीवे मारून टाकण्याची धमकी दिली. फिर्यादी व त्याचा मुलगा यांच्या साक्षी परस्परपूरक असून उलटतपासणीत त्यांचा मुख्य घटनाक्रम डळमळीत झालेला नाही. त्यामुळे आरोपीविरुद्धचे आरोप सिद्ध झाले असल्याने त्यास दोषी ठरविण्याची विनंती करण्यात आली.

**०८.** याउलट बचाव पक्षाचा युक्तिवाद असा आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये पांदण रस्त्याबाबत पूर्वीपासून दिवाणी व महसुली स्वरूपाचा वाद सुरू आहे. त्या वादातून आरोपीला खोटेपणाने या फौजदारी प्रकरणात गोविण्यात आले आहे.

फिर्यादीला शेतात जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध असून आरोपीच्या शेतातून रस्ता मिळविण्याच्या उद्देशाने ही फिर्याद दाखल करण्यात आली आहे. घटनेसंदर्भातील कोणताही स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. फिर्यादीने ज्यांची नावे प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित असल्याचे नमूद केले, त्या साक्षीदारांची अभियोजनाने तपासणी केलेली नाही. तसेच तपासी अधिकारी यांनाही वारंट बजावूनही न्यायालयात हजर करण्यात आलेले नसल्यामुळे तपासाची शहानिशा करण्याची संधी बचाव पक्षास मिळालेली नाही. त्यामुळे अभियोजनाचा पुरावा विश्वासार्ह नसून आरोपीस संशयाचा लाभ देण्यात यावा.

**०९.** दोन्ही पक्षांचा युक्तिवाद, अभिलेखावरील तोंडी व दस्तऐवजी पुरावा यांचा मी सखोल विचार केला आहे.

**१०.** साक्षीदार क्र. –१ प्रेमचंद मानुचंद नहार हे फिर्यादी असून त्यांनी आरोपीने त्यांची बैलगाडी अडवून सदर रस्ता त्यांच्या वहीवाटीचा नसल्याचे सांगितले, शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली, अशी साक्ष दिली आहे. साक्षीदार क्र.–२ सुशीलकुमार नहार यांनीही फिर्यादीच्या साक्षीस दुजोरा दिला आहे. या दोन्ही साक्षीदारांनी आरोपीकडून रस्ता अडविणे, शिवीगाळ करणे व धमकी देणे याबाबत सारखाच घटनाक्रम मांडलेला आहे. मात्र केवळ साक्षीदारांच्या साक्षीवरून दोषसिद्धी करता येईल का, याची स्वतंत्रपणे तपासणी करणे आवश्यक आहे.

**११.** साक्षीदार क्र.–१ यांनी उलटतपासणीत आरोपीबरोबर शेताच्या रस्त्याच्या संदर्भात वाद सुरू असल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. यावरून दोन्ही पक्षांमध्ये पांदण रस्त्याबाबत पूर्ववैमनस्य अस्तित्वात असल्याचे निर्विवादपणे दिसून येते. अशा परिस्थितीत अभियोजनाने स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदारांचा पुरावा सादर करणे अपेक्षित होते.

**१२.** फिर्यादीच्या स्वतःच्या फिर्यादीत तसेच साक्षीदार क्र.–२ यांच्या साक्षीत अंकुश वाघाडे, मधुकर आडे, विवेक राठोड व सिताराम राठोड हे घटनेच्या वेळी उपस्थित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यांपैकी एकाही साक्षीदाराची अभियोजनाने तपासणी केलेली नाही. अशा महत्त्वाच्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांना विनाकारण न्यायालयासमोर न आणल्यामुळे अभियोजनाविरुद्ध प्रतिकूल अनुमान (Adverse Inference) काढणे अपरिहार्य ठरते.

**१३.** याशिवाय तपासी अधिकारी यांना वारंट बजावूनही त्यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा, साक्षीदारांचे जबाब, तपासातील त्रुटी अथवा विरोधाभास याबाबत बचाव पक्षाला उलटतपासणी करण्याची संधी मिळालेली नाही. तपासी अधिकाऱ्याचा पुरावा उपलब्ध नसल्यामुळे अभियोजनाच्या तपासाची सत्यता न्यायालयासमोर सिद्ध झालेली नाही.

**१४.** कलम ३४१ भारतीय दंड संहितेअंतर्गत दोषसिद्धीसाठी आरोपीने फिर्यादीचा बेकायदेशीर प्रतिबंध (Wrongful Restraint) केला असल्याचे शंकातीतरीत्या सिद्ध

होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात ज्या रस्त्यावरून फिर्यादी जात होता त्या रस्त्याबाबत दोन्ही पक्षांमध्ये पूर्वीपासून वाद असल्याचे स्वतः फिर्यादीने मान्य केले आहे. त्या रस्त्याचा वापर करण्याचा फिर्यादीचा कायदेशीर हक्क काय होता, याबाबत अभियोजनाने कोणताही स्वतंत्र अथवा दस्तऐवजी पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे आरोपीने केलेला प्रतिबंध बेकायदेशीर होता, हे शंकातीतरीत्या सिद्ध होत नाही.

**१५.** कलम ५०४ भारतीय दंड संहितेनुसार केवळ शिवीगाळ झाल्याचे सिद्ध होणे पुरेसे नसून ती शिवीगाळ मुद्दाम अशा हेतूने करण्यात आली होती की त्यामुळे शांततेचा भंग होईल किंवा गुन्हा घडण्यास प्रवृत्त होईल, हे देखील सिद्ध होणे आवश्यक आहे. फिर्यादी व साक्षीदार क्र.–२ यांनी आरोपीने शिवीगाळ केल्याचे म्हटले असले तरी कोणती शिवी दिली, तिचा स्वरूप काय होता आणि आरोपीचा हेतू काय होता याबाबत स्पष्ट व ठोस पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे कलम ५०४ चे आवश्यक घटक सिद्ध होत नाहीत.

**१६.** त्याचप्रमाणे कलम ५०६ (भाग–II) अंतर्गत दोषसिद्धीसाठी धमकी ही अशी असणे आवश्यक आहे की त्यामुळे फिर्यादीच्या मनात वास्तविक व वाजवी भीती निर्माण झाली पाहिजे. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीने आरोपीने जीवे मारण्याची धमकी दिल्याचे म्हटले असले तरी त्या धमकीस पुष्टी देणारा कोणताही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार न्यायालयासमोर तपासण्यात आलेला नाही. त्यामुळे केवळ हितसंबंधी साक्षीदारांच्या साक्षीच्या आधारे, विशेषतः दोन्ही पक्षांमध्ये पूर्ववैमनस्य अस्तित्वात असताना, आरोपीस दोषी ठरविणे सुरक्षित ठरत नाही.

**१७.** फौजदारी प्रकीयाचे मूलभूत सिद्धांत असा आहे की, अभियोजनाने आरोपीचा अपराध वाजवी संशयापलीकडे (Beyond Reasonable Doubt) सिद्ध करणे आवश्यक असते. पुराव्यात संशय निर्माण झाल्यास त्याचा लाभ आरोपीस देणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व आरोपी यांच्यातील पूर्वीचा रस्त्याचा वाद, स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची अनुपस्थिती, तपासी अधिकाऱ्याची साक्ष उपलब्ध नसणे, तसेच आवश्यक घटक शंकातीतरीत्या सिद्ध न होणे या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३४१, ५०४ व ५०६ (भाग–II) अन्वये आरोप वाजवी संशयापलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे मी, मुद्दा क्र. १, २ व ३ यांची उत्तरे **नकारार्थी** नोंदवितो.

**मुद्दा क्र. ४ बाबत:**

**काय आदेश?**

**१८.** वरील मुद्दा क्र. १ ते ३ वरील चर्चेवरून अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३४१, ५०४ व ५०६ (भाग–II) अन्वये आरोप वाजवी संशयापलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरलेला आहे. फौजदारी न्यायशास्त्राच्या प्रस्थापित तत्त्वानुसार, दोषसिद्धीसाठी अभियोजनाने आपला खटला शंकातीतरीत्या सिद्ध करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात अभियोजनाच्या पुराव्यात निर्माण झालेला संशय दूर करण्यात अभियोजनास यश आलेले नाही. अशा परिस्थितीत संशयाचा लाभ आरोपीस

देणे आवश्यक ठरते. परिणामी, आरोपीची निर्दोष मुक्तता करणे उचित व न्याय्य ठरते. करीता मी, पुढीलप्रमाणे आदेश करतो.

## आ दे श

**१.** आरोपी **सखाराम नागोराव अवथळे** याची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, ५०४, ५०६ (II) अन्वये असलेल्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये **निर्दोषमुक्त** करण्यात येते.

**२.** आरोपीने दिलेले जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अंतर्गत सहा महिन्याच्या कालावधीकरीता रक्कम रु. १५,०००/– चा जातमुचलक्याचे बंधपत्र द्यावे व सदर सहा महीनाचा कालावधी संपल्यानंतर त्याचे बंधपत्र रद्द होवून आरोपीची पुर्णतः मुक्त करण्यात येत आहे.

Digitally signed by NILESH LAXMANRAO PATIL
Date: 2026.07.10 16:23:01 +0530

**दिनांक – १०/०७/२०२६**.
**ठिकाण –** दारव्हा, जि. यवतमा

**(निलेश ल. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय. क्र. २), दारव्हा.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | **:** | Ku Divya R. Gaikwad<br>Stenographer (Grade 3) |
| **Court Name** | **:** | 2nd Jt. CJJD & JMFC Darwha |
| **Date** | **:** | 10/07/2026 |
| **Judgment signed by presiding officer on** | **:** | 10/07/2026 |
| **Judgment uploaded on** | **:** | 10/07/2026 |